## ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/३३१/२०११/११

| | |
|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- १७/०३/२०११ |
| निकाल | दिनांक :- ०९/०५/२०१० |

श्री प्रेमचंद भिकचंद बाकलीवाल,
मु.पो. पुरी,
ता. गंगापुर, जिल्हा औरंगाबाद.

(ग्राहक क्र.५ एच.पी. ५०६६८००००४५१) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत ग्रामीण विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | व्ही.बी.मंत्री | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्यसचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १७/०३/२०११ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ३१/०३/२०११ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन कृषी पंपाकरीता ५ अश्वशक्ती वीज भार जोडणी दिनांक २६/०७/१९८३ पासुन घेतली आहे. ग्राहकाचे वीज देयकात माहे सप्टेबर २००४ मध्ये मीटर कॉस्ट ची रक्कम वसुन केलेली आहे. ग्राहकाने याबाबत दिनांक २७/११/२००८, २७/०४/२०१०,२१/१०/२०१० व शेवटी १२/११/२०१० रोजी सहाय्यक अभियंता गंगापुर यांच्याकडे लेखी तक्रारी केलेल्या आहेत. ग्राहकास विद्युत मीटर दिल्याचे दाखवुन अश्वशक्ती भारानुसार वीज देयकाची आकारणी करण्यात आल्यामुळे त्यांनी महावितरण कंपनीकडे तक्रारी दाखल केलेल्या आहेत परंतु कंपनीने त्याची दखल घेतली नाही व त्यामुळे ग्राहकाने वीज देयकाचा भरणा केलेला नाही. ग्राहकाने मंचाकडे तक्रार दाखल करुन देयक दुरुस्ती करण्याबाबत व व्याज तसेच अधिभार वजा करुन सुधारीत वीज देयक देण्याबाबत आदेश देण्यास विंनंती केली आहे.

२) वरील तक्रारीची सुनावणी दिनांक ३१/०३/२०११ व ०८/०४/२०११ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या दरम्यान नोडल अधिकारी प्रतिनिधी श्री एम.एन.ओव्हळ सहाय्यक अभियंता गंगापुर व वीज ग्राहक उपस्थित होते. ग्राहकाने आपली तक्रार वरील प्रमाणे कथन करुन असे सांगीतले की, त्याचा प्रत्यक्षात वीज भार ५ अश्वशक्ती असतांना त्यांना मागील २ महीन्यापासुन ७.५ अश्वशक्ती वीज भाराचे देयक देण्यात येत आहे. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचा वरील वीज भार चुकीने दाखविण्यात आल्याचे कबुल करुन वीज देयक दुरुस्ती शीट तसेच आपला लेखी जबाब सादर केला. दोन्ही बाजुचे म्हणने ऐकुन घेतल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवण्यात आले आहे.

३) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकास माहे सप्टेबर २००४,सप्टेबर २००५ व मार्च २००६ मध्ये अनुक्रमे रुपये ५००,६६६ व रुपये ५०० मीटर कॉस्ट लावण्यात आल्याचे सी.पी.एल. वर दिसुन येत आहे. परंतु ग्राहकाने त्याचा भरणा केलेला नाही. माहे डिसेंबर २०१० अखेर ग्राहकाकडे एकुण थकबाकी रुपये २०४५५.१२/- असल्याचे सी.पी.एल.नुसार असल्याचे दिसुन येत आहे. ग्राहकाने नियमीपणे वीज देयकाचा भरणा केला नसल्याचे दिसुन येत आहे. नोडल अधिकारी यांनी माहे सप्टेबर २०१० ते डिसेबर २०१० या कालावधीत ग्राहकास चुकीने दिलेले ७.५ अश्वशक्ती भाराचे वीज देयक रद्द करुन त्याऐवजी ५ अश्वशक्ती वीज भाराचे सुधारीत वीज देयक तयार करुन त्यामध्ये व्याज व दंडाची रक्कम कमी करुन एकुण रुपये २०४७.३४/- ची वजावट दर्शवीणारा प्रस्ताव मंचात सादर केला व तो योग्य असल्याचे मंचाचे मत आहे. नोडल अधिकारी यांनी माहे डिसेबर २०१० अखेर एकुण रुपये १८४५०/-थकबाकीचे वीज देयक ग्राहकास दिले आहे व ते योग्य आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीने वीज ग्राहकास रुपये २०४७.३४/-ची वजावट माहे डिसेंबर २०१० चे वीज देयकामध्ये करुन सुधारीत वीज देयक द्यावे.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| प्र. अ. सगणे | विलासचंद्र सु. काबरा | व्ही. बी. मंत्री |
|---|---|---|
| सदस्य/सचिव | सदस्य | अध्यक्ष |